

दिपावली

# याला जेवण ऐसे नाव

‘‘जयंतराव... शुक्रवारी रात्री जेवायला येता का ? तुम्ही उभयता या. इथल्या काही मित्रमंडळींना बोलावले आहे’’

फोन एका उच्चपदस्थ सरकारी (चुकलो... शासकीय) अधिकाऱ्यांचा होता, ज्यांची भेट इंग्लंडच्या वास्तव्यात झाली होती. मी खुशीत उत्तरलो :

‘‘येतो, अवश्य ! किती वाजता ?’’

‘‘ या की, आठच्या सुमाराला’’

ही होती १९७२ ची गोष्ट. आम्ही नुकतेच केंब्रिजहून मुंबईला ‘शिफ्ट’ झालो होतो. घर लागायचे होते. बाड बिस्तरा बोटीने सावकाश मागून येत होता. तेव्हा बाहेरची मेजवानी अर्थातच स्वागतार्ह होती.

माझ्या डोळ्यापुढे होती केंब्रिज मधली जेवणाची आमंत्रणे...

* * *

‘प्रोफेसर ॲण्ड मिसेस जोन्स रिक्वेस्ट द कंपनी ऑफ ... ॲट डिनर ऑन ... ॲट सेवन थर्टी फॉर एट’ अशा धर्तीचे आमंत्रण असायचे. म्हणजे तुम्ही साडेसातला यावे, अर्धा तास गप्पा मारून आठला टेबलाशी जेवायला बसावे.

त्या अर्ध्या तासात एखादे ड्रिंक... शेरी किंवा व्हाइट वाइन. पुरुष बहुतेक ड्राय शेरी घेत तर बायका स्वीट. आमच्यासारखे ह्या नियमावलीत न बसणारे काही थोडे ‘सॉफ्ट ड्रिंक’ वाले.

आमंत्रित लोक साडेसात ते पावणेआठपर्यंत येत आणि आठसव्वा-आठपर्यंत यजमानीण बाई ‘जेवायला या’ म्हणून टेबलाशी बोलवत. कोणी कुठे बसायचे हे पण त्या ठरवत. मुख्य नियम असा : यजमान यजमानीण टेबलाच्या दोन टोकांना, इतर जोडपी पती-पत्नी शेजारी शेजारी नव्हे आणि शक्यतो दोन पुरुषांमध्ये एक स्त्री आणि दोन स्त्रियांमध्ये एक पुरुष. अर्थात हे नेहमीच जमण्यासारखे नव्हते. पण शक्यतो जमवले जाई. निमंत्रितांची संख्या टेबलाभोवती मावेल इतकीच.


सूप, प्रॉन सॅलड किंवा तत्सम पहिला कोर्स. दुसऱ्या ‘मेन’ कोर्स बरोबर योग्य ती वाइन... व्हाइट किंवा रेड... कुठल्या मळ्यातली आणि कोठल्या वर्षातली ते यजमानांनी जाणकारपणे ठरवलेली. त्यानंतर गोड पदार्थ आणि कधी कधी त्यानंतर डेजर्ट म्हणून चीज किंवा फळे. शेवटी कॉफी आणि ब्रॅण्डीवर अर्धा पाउण तास गप्पा ड्रॉइंग रूम मध्ये.

अशा तऱ्हेने जेवणाचा हा आखीव रेखीव कार्यक्रम वेळापत्रकाप्रमाणे पूर्ण होऊन आम्ही साडे अकरापर्यंत घरी पोचून ठरवून ठेवलेल्या बेबी सिटरला रजा देत असू.

* * *

हे चित्र डोळ्यापुढे ठेवून आम्ही दोघांनी बेबी सिटरची योजना केली आणि आमंत्रणाच्या जागी कसे पोचायचे ती माहिती घेऊन ठेवली. कारण मुंबईने आपण पाश्चात्य शहराप्रमाणे सुधारलेलो असल्याची कितीही शेखी मिरवली तरी रस्त्यांवर क्रमाने घर नंबर लावण्याचे तिला सुचलेले नाही. ‘अमुक सिनेमा शेजारी’ किंवा ‘तमुक बँकेच्या डायगोनली ऑपोजिट’ (हा ‘डायगोनल’ कुठून कोठपर्यंत काढायचा हे मला युक्लिडच्या पुस्तकात सापडले नाही) अशा धर्तीवर मुंबईतले पत्ते सांगितले जातात.

तरी पोचायला सव्वा आठ झाले म्हणून मी मनातल्या मनात स्वतःवर आणि उघडपणे बायकोवर चरफडत होतो. हा उशीर केंब्रिजमध्ये खपला नसता. उशीर झाल्याबद्दल दिलगिरीच्या शब्दांची जुळवाजुळव करीत मी दाराची घंटा वाजवली. सुहास्यवदनांनी यजमानांनी दार



जानकी शिवलकर

उघडले आणि मी जागच्या जागी थिजून गेलो.

दिवाणखाना मोकळा होता.

उशिरा येण्यापेक्षा मोठी घोडचूक चुकीच्या दिवशी येण्याची आमच्या हातून घडली नाही ना ?

''या... इतर लोक येतीलच इतक्यात''. असे म्हणून त्यांनी यजमाणीन बाईंना साद घातली. आम्हाला बसवून त्यांनी विचारले; ''काय घेणार ? स्कॉच... का जिन ? बियरपण आहे आमच्याकडे.''

''आम्ही त्या पंथातले नाही !'' मी उत्तरलो.

मला आठवले प्रथम इंग्लंडला बोटीने जाताना काही भारतीय विद्यार्थ्यांनी हा 'पंथ' उत्साहाने स्वीकारला होता आणि मला बजावले होते, ''ह्याशिवाय इंग्लंडच्या थंडीत गत्यंतर नाही.'' अजूनही तसे बजावले जाते. काही (भारताचा

## जयंत नारळीकर

किनारा न सोडलेले) महाभाग असेही सांगतात... ''तिथे पिण्याचे पाणी मिळणार नाही म्हणून...'' वास्तविक, पिण्याजोगे पिण्याचे पाणी मुंबईतल्या नळातून मिळत नाही ते चोवीस तास इंग्लंडात सहजगत्या उपलब्ध असते.

यजमानांच्या चेहऱ्यावर कसला तरी एक भाव झळकून गेला. नक्की कसला ते वर्णन करायला माझ्या मराठीत योग्य शब्द नाही. परंतु तसलाच भाव वीस पंचवीस वर्षांपूर्वी पॅरिसमधील रेस्तराँतील वेटर्सच्या चेहऱ्यावर मी पाहिला होता, जेव्हा 'कुठली वाईन ऑर्डर करणार ?' असे त्यांनी विचारले असता मी 'लो नॅतुराल' (शुद्ध पाणी) असे सांगत असे. आता पॅरिसमध्येदेखील सन्मानाने पाणी मागता येते. कदाचित ती प्रतिष्ठा पाण्याला भारतातल्या उच्चभ्रू दिवाणखान्यात आज नाही तरी एकविसाव्या शतकात मिळेलही.

त्या रात्री काही निमंत्रित स्त्रिया 'सॉफ्ट ड्रिंक' घेतील ह्या अपेक्षेने फ्रूट ज्यूस देखील उपलब्ध असल्याने माझी सोय झाली. आजही परिस्थिती फारशी बदललेली नाही... पण १९७२ मध्ये दारूबंदीच्या काळातून स्थित्यंतर होत होते. त्यामुळे 'ओले' जेवण आजच्या इतके प्रतिष्ठित झाले नव्हते. आज उच्चभ्रूंच्या घरी किंवा पंचतारांकित (-वा तत्सम आव आणणाऱ्या) हॉटेलांत आयोजलेल्या 'बार' मध्ये 'हार्ड ड्रिंक्स' पुढे मिरवत असतात. ती बाजूला करून मागे (किंवा जमिनीवरच्या खोक्यात) ठेवलेले कोला किंवा फ्रूट जूस मागणारा अगदीच 'हा' समजला जातो.

* * *

नऊ वाजेपर्यंत अर्धा दिवाणखाना भरून गेला होता व 'कडी पेये' सुरळीत वहायला सुरवात झाली होती बहुतेक सव्वा नऊपर्यंत भोजनाचे पदार्थ मांडायला सुरवात होईल असा आम्ही दोघांनी अंदाज केला... मुंबईत फार लांबून लोक येतात तेव्हा थोडा उशीर अपरिहार्य आहे. वास्तविक असा तर्क करणे म्हणजे गणिताचे उच्च शिक्षण घेतलेल्या आम्हा दोघांची एक अक्षम्य चूक होती. वेगवेगळ्या गृहीतकांवर आधारलेली गणिते वेगवेगळ्या स्वरूपाची असतात हे आम्हाला माहीत होते. तसेच वेगळ्या गृहीतकांवर आधारलेली जेवणेही वेगळी का असू नयेत ?

नवानंतर आणखी लोक आले. दिवाणखान्यात वीस-पंचवीस मावत नसल्याने काही लोंढा शेजारच्या खोलीत गेला. पुरातन संस्कृतीस अनुसरून एक गोष्ट मात्र दिसून आली - आजही येते - ती म्हणजे बायका-पुरुषांतली विभागणी. संभाषणाचे विषयही वेगळे... साड्या-लग्ने एका बाजूला तर देशाची ढासळती परिस्थिती दुसरीकडे. हे विषयही आज तेच !

मी परदेशात पंधरा वर्षे वास्तव्य करून परत आलो... हा अव्यवहारी निर्णय मी का घेतला असे जो तो मला सौम्यपणे विचारत होता. कारण प्रत्येकाच्या मते देशातील परिस्थिती विकोपाला गेली असल्याने देश जेमतेम दोनतीन वर्षे तग धरील. त्या रात्री मी ही मते ऐकून हादरून गेलो होतो. पण हळूहळू मला कळून चुकले की हा एक केवळ संभाषणाचा विषय असतो. देश आजही तग धरून आहे आणि त्या रात्री काळेकुट्ट भवितव्य रंगवून सांगणारे काही जण आज देशच काय पृथ्वी सोडून गेले आहेत. पण 'दोन-तीन वर्षांत देशाचे वाटोळे होणार' हे भवितव्य आजही तितकेच आवर्जून वर्तवले जाते... आणि त्यामागचा जोर ग्लासागणिक वाढत जातो.

* * *

साडे नऊ झाले, दहा झाले... घड्याळाचा काटा साडेदहाकडे सरकत होता. मी लांबूनच टेबलावर रचलेल्या बशा मोजल्या आणि दोनतीन खोल्यांतून फिरणाऱ्या पाहुणेमंडळींची संख्या मोजली. बहुतेक अपेक्षित सर्व आले होते. पण अजून स्कॉचच्या पुरेशा आवृत्त्या पुऱ्या झाल्या नसाव्यात. स्कॉच घेतली की भूक प्रज्वलित होते की मारली जाते हे मला माहीत नाही... बहुतेक मारली जात असावी. कारण खाद्यान्नाची गरज वा आठवण कोणालाच भासत नव्हती. माझ्या मात्र पोटात कावळे कावकाव करायला लागले होते. पण पोटापेक्षा मला काळजी होती वेळेची ... बेबी सिटरला सांगितलेल्या कालमर्यादेची.

अकरा वाजता मी पत्नीला हळूच विचारले... आता फार तर अर्धा तास आपण थांबू शकू... काय करावे ? तिने यजमानीणबाईंना आमची अडचण सांगितली. बहुतेक त्याचा परिणाम म्हणून सुपाचे पेले यायला सुरुवात झाली.

आजपर्यंतच्या अशा अनेक जेवणांतून मी त्या क्षणाची वाट पहात असतो. एखाद्या कार्यक्रमाला मंत्री अजून आले नाहीत म्हणून सुरुवात होत नाही. अशा वेळी तासदोन तास ताटकळत बसलेल्या श्रोत्यांना तो मंत्री अखेर आलेला पाहून जो आनंद होत असेल (- हा मी अनुभवलेला नाही कारण अशा कार्यक्रमात मी कधी गेलो नाही) तसा आनंद हा सुपाचा पेला पाहून मला होतो.

आणि मंत्र्याला उशीर झाला असल्याने तो कार्यक्रम जसा भराभरा उरकण्यात येतो तसाच हा सुपानंतरचा जेवणाचा ! फरक इतकाच की जेवणाचे हे वेळापत्रक पूर्वनियोजित असते : पेयाच्या पुरेशा आवृत्त्या होण्यापूर्वी जेवण पुढे आणणे कमीपणाचे मानले जाते, तर मंत्र्यांना झालेला उशीर 'अनपेक्षित' असतो.

* * *

सूप उरकल्यावर टेबलावर पायरेक्सच्या भांड्यांत विविध खाद्यपदार्थ येऊन सजायला लागले. आणि लेडीज फर्स्ट ह्या न्यायाने आधी बायकांचा क्यू लागला. नाहीतरी पुरुषांना आपापले 'पेग' अजून संपवायचे होतेच. त्यामुळे पुरुषांत माझा नंबर आधी लागला.

जेवण उत्तर भारतीय पद्धतीचे होते. पदार्थ उत्तम आणि चवदार होते. पण बुफे पद्धतीत त्या पदार्थांना न्याय मिळत नाही... अशा तऱ्हेच्या ओल्या जेवणात तर नाहीच नाही. एका बशीत पदार्थ कसेबसे भरायचे, त्यातून खाणाऱ्याची कसरत सुरू होते... नॅपकिन आणि प्लेट सांभाळत उभे राहून खाण्याची किंवा खुर्ची नशिबी असलीच तर ती प्लेट कशीबशी मांडीवर 'बॅलन्स' करून खाण्याची. त्यातून प्लेटबरोबर एक टेबलस्पून कडमडायला दिला जातो... तो खाली उडी मारायला पहात असतो. हा कशासाठी ? ह्या उच्चभ्रू लोकांना हाताने जेवण्याची लाज वाटते म्हणून ? मग हे लोक चमच्याने पोळी (चुकलो-नान्) कशी खातात ?

मला वाटते अन्नदेवतेचा अपमान फार वेळ होऊ नये म्हणून खाणारे गडबडीत जेवण उरकून प्लेट इतस्ततः टाकून मोकळे होतात आणि चिकट हात कागदी नॅपकिनला पुसून 'स्वच्छ' करतात. कारण तो चमचा वापरल्यामुळे 'ऑफिशियली' हात मुळात स्वच्छच असतात. केवळ आमच्यासारख्या काही मागासलेल्यांनी विचारले तर त्यांना वॉश बेसिन दाखवण्यात येते.

अखेर पावणेबाराला हा उपक्रम संपवून आम्ही यजमानीण बाईंचा निरोप घ्यायला आलो. ''अहो बसा ना थोडा वेळ... आत्ता चहा कॉफी येईल... तुमच्याशी बोलायला वेळच झाला नाही.''

कसा होणार ? पंचवीस पाहुण्यांत माझ्या वाट्याला वेळ कितीसा येणार ? ह्या मेजवानीच्या उरलेल्या भागासाठी (पुन्हा चुकलो... उर्वरित भागासाठी) आणखी तास-दीड तास खर्च करायचे मनोबल आणि शारीरिक बल आम्हा दोघांत नव्हते.

दोन घडीचे जीवन मी आनंदाने जगेन, पण हे दहा घडीचे जेवण म्हणजे खडतर तपश्चर्या वाटते.

* * *

**टीप :** काही तपशील सोडला तर हा प्रसंग सत्यघटनेवर आधारलेला आहे. असे प्रसंग माझ्यावर वेळोवेळी येतात, मुंबईतच नव्हे तर इतर 'कमी सुधारलेल्या' गावांतसुद्धा. सांगलीत खास माझ्यासाठी आयोजित जेवणात मीच एक 'कोरडा' होतो. दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचची एस. टी. पकडायची ह्या कारणास्तवच माझी सुटका मध्यरात्री झाली. कोल्हापुरात तर मध्यरात्रीपर्यंत पेयांपलीकडे मजलच गेली नसल्याने मी न जेवताच परतलो.

पूर्वी पाटावर बसून जेवायची पद्धत होती. तेव्हा स्वस्थ बसून जेवायचे सुख तरी लाभत असे. पण ज्या पेशवाई पुण्यात मोतीचुराच्या लाडवांच्या व श्रीखंडाच्या पंगती असत, तेथेही आता ओल्या जेवणाचे आणि बुफेचे लोण आले आहे. बुफे हा पाश्चात्य प्रकार समजला जातो. पण पाश्चात्य बुफेत टेबलखुर्चीची, काटे चमचा-सुरीची सोय असते. त्यामुळे भारतीय बुफेत माझ्या सारखाच हवालदील झालेला इंग्रजही मी पाहिलेला आहे. कदाचित पुढे-मागे ही पद्धत बदलेलही... पण तोवर यालाच जेवण ऐसे नाव ! ●